# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील साई ते केळवणे गावांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याबाबत

**(१) ७०९ (२२-१२-२०१४). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील साई ते केळवणे गावांतील शेतीचा बंधारा माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान फुटल्यामुळे सुमारे १२०० ते १५०० एकर जमिन नापिक होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी व पंचनामे शासनाने केले आहेत काय,
(३) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने कोणती मदत दिली वा देण्यात येत आहे,
(४) तसेच फुटलेल्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) नाही,

तथापि, साई ते केळवणे या भागात साई ही शासकीय योजना असून सदर योजना सुस्थितीत आहे. या भागात कोनी, केळवणे, पुनाडे, वशेणी या खाजगी खारभूमी योजना आहेत. या योजनांपैकी कोनी, केळवणे या योजनेच्या बांधाला नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास अंदाजे ५० मी.लांबीची खांड गेली होती. त्यामुळे अंदाजे ४९९ हे.क्षेत्रामध्ये खारे पाणी शेतात घुसले होते.
(२), (३) व (४) खाजगी खारभुमी योजना शासनाच्या ताब्यात घेता येत नाहीत. सदर योजनांची नुतनीकरणाची कामे खारभुमी विकास महामंडळांतर्गत करण्याकरीता त्या योजनांना प्रथम केंद्र शासनाच्या सागरी किनारा नियमन, कायदा, सन १९९१ व २०११ मधून सूट मिळणे

आवश्यक आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या सदर कायद्यामधून सुट मिळणेबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून पर्यावरण विभागास सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल तालुक्यातील (जि.जळगांव) सावरखेडा येथील बंधा-याचा नालाभराव फुटल्याने पाणी वाहून जात असल्याबाबत**

**(२) १३३४ (२२-१२-२०१४). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल तालुक्यातील (जि.जळगांव) सावरखेडा येथील बंधा-याला सन २००६ पासून नालाभराव फुटल्याने पाणी वाहून जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनास "पाणी अडवा पाणी जिरवा" या कार्यक्रमास राबविण्यास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित बंधा-यांच्या दुरुस्तीबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, यांस जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय, सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सावरखेडा परिसरातील नागादेवी पाझर तवालाचा नालाभराव फुटला आहे.

(२) नाही.

(३) निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील चार मनोरुग्णालयाचा कारभार सुधारण्याबाबत**

**(३) ७७८५ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार मनोरुग्णालयाचा कारभार सुधारण्यासाठी शासनाने ११ जणांची राज्यस्तरीय समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) तद्‌नुसार सदर अहवालातील शिफारशींनुसार यावर अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) समितीच्या अहवालात मनोरुग्णालयातील रुग्णांचा आहार, स्वच्छता, औषधे, आरोग्य समुपदेशन इत्यादीबाबत अनेक शिफारशी करण्यात आल्या आहेत, या शिफारशींवर अंमलबजावणीची कार्यवाही सुरु झालेली आहे.

---

**सन १९८० नंतर आजतागायत एकाही जिल्हाधिका-यांनी वनजमिनीचे वाटप करताना शासनाची परवानगी घेतली नसल्याबाबत**

**(४) ८५९७ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनजमीनीचे वाटप करताना शासनाची परवानगी घेणे आवश्यक असताना सन १९८० नंतर आजतागायत एकाही जिल्हाधिका-यांनी वनजमिनीचे वाटप करताना शासनाची परवानगी घेतली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातून दोन हजार हेक्टर जमीनचे वाटप विनापरवाना महसूल विभागाने केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी वनजमिनी परस्पर विकणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासन काय कारवाई करणार आहे वा केली आहे,

(६) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५)** :(१) जळगांव जिल्ह्यातील मौजे गौंडखेल ता.संगमनेर येथील गट नं. १६० मधील २३.२० हे आर व गट नं. १६५ मधील २.०० हे.आर अशी एकूण २५.२० हे .आर क्षेत्र वन विभागाने अखत्यारीतील राखीव वनजमीन ही महसूल जमीन समजून तत्कालीन तहसिलदार, जामनेर यांनी त्यांचेकडील आदेश दिनांक १२ जून, १९९२ व दिनांक २१ जून, १९९९ अन्वये वाटप केलेले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सन १९८० नंतर वाटप केलेल्या ९७ सर्व्हे नंबर मध्ये ३५७.१७ हे.आर जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. सदर जमीन महसूल विभागाची अथवा वन विभागची आहे याबाबत वाद आहे. हा वाद जमीन वाटप झाल्यानंतर उद्भवला आहे. तथापि, सदर जमिनीवर वन विभागाने मालकी दर्शविली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) जळगांव जिल्ह्याशी संबंधीत बाब निदर्शनास आल्यावर उपविभागीय अधिकारी, जळगांव भाम, जळगांव यांचेकडील फेरचौकशी हक्क व अपिल क्र. ५९/२०१०, दिनांक १९ जुलै, २०१२ च्या आदेशान्वये वनजमीनीचे वाटप झाले बाबतचे वरील आदेश रद्द करुन वन विभागाची मालकी मान्य करण्यात आलेली आहे. सदर जमीन वन विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे.

(५) व (६) जळगांव जिल्ह्यात, प्रश्नाधिन वन जमीनी ह्या महसूल विभागाच्या असल्याचे समजून तत्कालीन तहसिलदार, जामनेर यांनी सदर जमीनी वरील अतिक्रमणे नियमित केलेले होते, तत्कालीन तहसिलदार सेवेनिवृत्ती नंतर मयत झालेले आहेत. त्यामुळे तत्कालीन तहसिलदारांवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८३ चे नियम २७ नुसार कार्यवाही करता येणार नाही.

---

**राज्यातील पुर्व विदर्भाच्या हरीतक्रांतीसाठी मामा तलावांसह सिंचन विभागाच्या मालकीत असलेल्या तलावांना २ हजार ५२० कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता असल्याबाबत**

**(५) ८७३४ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुर्व विदर्भाच्या हरीतक्रांतीसाठी मामा तलावांसह सिंचन विभागाच्या मालकीत असलेल्या तलावांना २ हजार ५२० कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता असल्याबाबतचे वृत्त दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळकर समितीच्या शिफारसीनुसार पुर्व विदर्भातील ६ हजार ८३२ मामा तलाव व सिंचन विभागाच्या मालकीत असलेल्या तलावांच्या पुर्नस्थापनेकरीता २ हजार ५२० कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुर्व विदर्भात १ हजार २१८ तलावात हे २६ हजार २६३ हेक्टर सिंचन क्षमता असलेले तर ० ते १०० हेक्टर सिंचनक्षमता असलेले ६ हजार ७३४ तलाव आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भागातील सिंचनाचा अनुशेष भरुन निघण्याकरीता सन २०१५-१६ मध्ये निधीची तरतूद करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास त्याचा कालावधी काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) केळकर समितीच्या अहवालानुसार पूर्व विदर्भात १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेले १२८ माजी मालगुजारी तलाव असून त्यांची एकूण सिंचन क्षमता २६,२६३ हेक्टर आहे. तर ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले ६,७३४ मालगुजारी तलाव असून त्यांची एकूण सिंचन क्षमता ९९,७२३ हेक्टर इतकी आहे.

(४) व (५) माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीकरिता सन २०१५-१६ मध्ये रुपये १०० कोटी इतकी नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे. त्यासंदर्भातील नवीन योजनेस शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुलूंड येथील राज्य कामगार विमा योजना रूग्णालयातील परिचारिकांना घर भाडे भत्ता व शहर पुरक भत्ता मिळण्याबाबत**

**(६) १२०४१ (०६-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड येथील राज्य कामगार विमा योजना रूग्णालयातील परिचारिकांना मा.कोर्टाच्या आदेशानुसार घर भाडे भत्ता व शहर पुरक भत्ता मिळण्याबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने याप्रकरणाची माहिती शासनास सादर करण्यात आली आहे काय,

(३) तसेच कर्मचा-यांचे घरभाडे भत्ता कापून घेण्याची कार्यवाही कोणत्या नियमाद्वारे करण्यात आली आहे,

(४) सदर प्रकरणी प्राधिकरणाच्या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, व उक्त कारवाई लवकर करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-११-२०१५) :**(१) व (२) होय.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दि.०१ जानेवारी, १९९१ मधील निर्देशांनुसार कर्मचा-यांना घरभाडे माफ निवासस्थान वाटप करण्यात आले असून अशा कर्मचाऱ्यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि.३० मे, १९८९ नुसार घरभाडे भत्त अनुज्ञेय नसल्याने कर्मचा-यांना घरभाडे भत्ता दिला जात नाही.

(४) व (५) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाच्या विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**अमरावती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची औषधे कमी दर्जाची असल्याच्या आरोपाबाबत**

**(७) १२५४४ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला नियोजन समितीकडून पैसा जिल्हा परिषदेला जाऊन तसेच शासन औषधे खरेदी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची मंजूरी घेते व दरवर्षी चार कोटी रुपयांची औषधे खरेदी करावी लागते, परंतु ही औषधे कमी दर्जाची असल्याचा आरोप जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आरोग्य सभापती यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-११-२०१५) :**(१) हे खरे नाही. जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून औषधी/साहित्य खरेदीस संचालक आरोग्य सेवा यांची तांत्रिक मान्यता देण्यात येते.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीकडून अमरावती जिल्हा परिषदेस रुपये २,५७,६८,०००/- एवढे अनुदान प्राप्त झाले होते.

सदर अनुदानातून करण्यात आलेली औषध खरेदी आरोग्य समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांची प्रशासकीय मान्यता घेऊन शासन परिपत्रक दिनांक ११.०२.२०१३ मधील मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना प्राप्त झालेली औषधे गुणवत्तापुर्ण व स्पेसिफिकेशननुसार असल्याची खात्री झाल्यानंतरच सदरहू औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रांना वितरीत करण्यात आली आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या जिल्हा परिषद सिंचन प्रकल्पातून सिंचन क्षमतेनुसार सिंचन वाढविण्याबाबत**

**(८) १३७९४ (०८-०४-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या जिल्हा परिषद सिंचन प्रकल्पातून सिंचन क्षमतेच्या तुलनेत अतिशय अल्प सिंचन होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातून अपेक्षित सिंचन क्षमतेनुसार सिंचन वाढविण्याकरिता काय कार्यवाही करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) लघु सिंचन परिषद विभाग, यवतमाळकडील सिंचन तलाव २७, कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे १०७ असे एकूण १३४ योजना व लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, यवतमाळकडील २ योजना अश्या एकण १३६ योजनांची दुरुस्ती करीत विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत डी.पी.आर. ला मंजूरी प्राप्त आहे. त्यापैकी ४ सिंचन तलाव व ७० कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्ती अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर कामे हाती घेण्यात आली आहे. सदरहू योजना पुढील २ वर्षात दुरुस्त करुन ४०६३ व २०६ असे एकूण ४२६९ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात येईल.

---

**निमनी (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील गर्भवती महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत**

**(९) १४०५५ (०८-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमनी (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील गर्भवती महिला रंजीता दिनेश सिडाम या महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**डॉ. दीपक सावंत (१६-११-२०१५) :**(१) निमनी, ता.झरी, जि.यवतमाळ, येथील गर्भवती महिला रंजिता दिनेश सिडाम या महिलेचा दि.२०.०१.२०१५ रोजी मृत्यू झालेला आहे परंतु सदर मत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला नाही.

(२) चौकशी करण्यात आली आहे.

(३) व (४) रंजिता दिनेश सिडाम या गर्भवती महिलेच्या मृत्यू बाबत संबंधीत डॉक्टरांची सखोल चौकशी करण्यात आली व चौकशीअंती गर्भवती महिलेचा मृत्यू डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे झालेला नाही.

दि..२६.०५.२०१५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा माता मृत्यू गुणवत्ता अभिवचन समितीच्या सभेत मयत रंजिता दिनेश सिडाम या मातेच्या मृत्यूचे अन्वेषण करण्यात आले. सदर समितीने अन्वेषणावरुन सदर माता हि ७ Months Amenorrhoea with ३rd grade Spleenomegaly with Hepatomegaly with Sickle Cell disease with Sickle Cell Crisis ने मृत्यू पावली असा निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे डॉक्टरांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बर्की (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) या लघुपाटबंधारे तलावाचे काम अनेक वर्षे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(१०) १४८०३ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बर्की (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) या लघुपाटबंधारे तलावाचे काम अनेक वर्षे अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंधारण विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे कय,

(३) असल्यास, ही योजना मापदंडा बाहेर जात असल्यामुळे सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेला लागु केलेला आर्थिक मापदंड सन २००९/१० मध्ये निश्चित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे विभागाला सुधारीत आर्थिक मापदंड लागु करणेविषयी शासन तातडीने कार्यवाही करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) नाही.

प्रकल्पाचे काम सन २००४ मध्ये भौतिकदृष्ट्या पूर्ण असून तलावात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होत आहे. मात्र, काही अनुषंगीक कामे उदा. धरण पोहोच रस्ता इत्यादी कामे करावयाची आहेत.

(२) नाही.

तथापि क्षेत्रिय कार्यालयास सु-सुधारीत प्र.मा.प्रस्ताव तयार करणे प्रगतीत आहे.

(३) व (४) नाही.

(५) सद्य:स्थितीत प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रेरणा महिला वसतीगृह (ता.बारामती, जि.पुणे) या संस्थेतील प्रवेशित मुलींचा विवाह करण्यात आल्याबाबत**

**(११) १६२७६ (१९-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण १०१९/प्र.क्र..४१४/का-३/मंत्रालय, मुंबई दिनांक १८ ऑगस्ट, २००१ तसेच शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण २०११/प्रक्र.२४२(भाग १)/का-३मंत्रालय, मुंबई दिनांक १ मार्च, २०१२ नुसार अनाथालय, शासन राज्यगृहे, अल्पमुदतीचे निवासस्थान गृहे, बालगृहे मधील शासन व स्वयंसेवी संस्थांमधील मुलींच्या विवाहासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची मान्यता घेऊन विवाह लावणे आवश्यक असून बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ जून, २००८ ते १० जून, २०१२ अखेर अधिक्षिका, शासकीय महिला वसतीगृह, बारामती, (जि.पुणे) (प्रेरणा महिला वसतीगृह, ता.बारामती, जि.पुणे) यांनी संस्थेतील १८ प्रवेशित मुलींचे विवाह आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी मान्यता न घेता लावले व ३ कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिक्षिका यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन १८ प्रवेशित मुलींचे विवाह लावून त्यांच्या भवितव्याशी व आयुष्याशी खेळण्याचा तसेच नियमबाह्य ३ प्रवेशित मुलींचे कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव सादर करुन बेशिस्तीचे वर्तन करुन गैरकृत्य केले असूनही त्यांच्यावर महिला व बाल विकास खात्याने कोणतीही कारवाई केली नाह, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तदनुषंगाने संबंधीत दोषींवर अद्यापही कोणतीच कारवाई न होण्याची तसेच संपूर्ण प्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे

दिनांक १८ ऑगस्ट, २००१ चे शासन निणर्यासाठी संस्थामधील निराक्षीत मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य मंजूरीचे प्रस्तावास आयुक्त यांची मान्यता घेण्याचे नमूद आहे. तथापि, १९७३ च्या नियमावली मध्ये प्रवेशितांच्या विविहापूर्वी आयुक्तालयाची मान्यता घेण्याची तरतूद होती. तथापि, शासन निर्णय दिनांक २५.०५.२००१ अन्वये सदर नियमावली अधिक्रमीत झाल्याने त्यानंतर विवाहासाठी मान्यता घेण्याबाबत कोणतेही निर्देश नसल्याने प्रचलीत पध्दतीनुसार विवाहाकरीता आयुक्तालयाची मान्यता घेण्यात येत होती. परंतु सदर बाब बंधनकारक असल्याबाबत कोणताही शासन निर्णय कार्यान्वित नव्हता त्यानंतर दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयानुसार संस्थेतील प्रवेशितांचे विवाह व आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत आयुक्तालयास सादर करावा असे नमूद आहे.

(२) नाही, तथापि, सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशी नुसार विवाहासाठी मान्यता घेण्याबाबतची बाब दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयानुसार पाच विवाह मान्यता न घेता करण्यात आला असल्याचे निदशनास आले. तसेच कार्योत्तर मंजूरीचे ३ प्रस्ताव सादर करण्यात आले होते.

(३) नाही, संस्था अधिक्षक यांना निलंबित करण्यात आले. तसेच त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी खाजगी व्यक्तीने अधिक्षिका यांचेविरुध्द बाल विवाहाचा गुन्हा नोंदविला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) नाही, तथापि, सदर प्रकरणांची चौकशी राज्य महिला आयोग अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून करण्यात येवून त्यांचे अहवालानुसार ५ प्रवेशितांचे विवाह मान्यता न घेतल्याचे तसेच त्यापैकी १ विवाह बाल विवाह झाल्याचे प्रथम दर्शनी आढळून आल्याने संस्था अधिक्षक यांना निलंबित करण्यात आले तसेच त्याचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली आहे.

---

### किवळ, (ता.कराड, जि.सातारा) येथे राबविण्यात आलेल्या ओढा जोड प्रकल्पाबाबत

**(१२) १६३९१ (१७-०९-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किवळ (ता.कराड, जि.सातारा) या कायम दुष्काळी गावात सिमेंटच्या साखळी बंधा-याच्या योजनेतून कृषी विभाग, सहकारी कारखाना, जैन इरिगेशन आणि लोकसहभागातून राज्यात प्रथमच नुकताच ओढाजोड प्रकल्प राबविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ओढाजोड प्रकल्पामुळे सदर गावचे ५०० एकर क्षेत्र ओलीताखाली आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाची उपयोगिता लक्षात सदर प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. किवळ ता.कराड जि.सातारा येथे साखळी सिमेंट बंधाऱ्याच्या योजनेतून ओढाजोड प्रकल्प (मुख्य ओढा ते लेंडोरी ओढा) राबविण्यात आला आहे.

(२) होय, किवळ येथील ओढाजोड प्रकल्पामुळे गावचे १८० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे,

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत, ओढाजोड प्रकल्प राबविणेत येत आहे.

---

**उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेबाबत**

**(१३) १६४५७ (१४-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १३ जुलै, २००६ रोजी उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना व्हावी यासाठी विधानसभेत ठराव मंजूर होवून देखील आजतागायत त्यावर पुढे कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही असे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खान्देशाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने सदर वैधानिक विकास मंडळाची स्थापना होण्यासाठी शासन तातडीने काही पावले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :**(१), (२) व (३) दिनांक १३ जुलै, २००६ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक व अहमदनगर या ०५ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत एकमताने ठराव पारित केला. त्यानुसार सदर ठराव दिनांक २६ फेब्रुवारी, २००७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठवून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (अ) मध्ये दुरुस्ती करण्याबाबत विनंती करण्याबाबत विनंती करण्यात आली. तद्नंतर दिनांक १९ डिसेंबर, २०११, १५ जुलै, २०१३, ०८ जुलै, २०१४ व १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये उत्तर महाराष्ट्राकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही होण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात सन २०१०-२०११ पासून सुरु असलेल्या एकात्मीक पाणलोट व्यवस्थान कार्यक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय कक्ष माहिती केंद्रात नियुक्त असलेल्या पाणलोट पथक सदस्यांना शासकिय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(१४) १६४६२ (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१०-२०११ पासून सुरु असलेल्या एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय कक्ष माहिती केंद्रात नियुक्त असलेल्या पाणलोट पथक सदस्यांना शासकिय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याकरीता धुळे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असल्याचे माहे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पथक सदस्यांच्या सेवेचे अवलोकन करुन त्यांचे वेतनश्रेणी सुधारणे व शासकिय सेवेत कायमस्वरुपी समाविष्ट करुन घेणे याबाबत शासनाने काही उपाययोजना केली आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदर तपशलि उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाचा प्रकल्प कालावधी ५ वर्षाचा आहे. पाणलोट विकास पथक सदस्य यांची नियुक्ती त्रयस्थ संस्थेमार्फत कंत्राटी कराराने, सेवा प्रकल्प कालावधीकरीता केली जाते. त्यामुळे त्यांना कायमस्वरुपी सेवेत समावून घेता येत नाही. सदर सदस्यांचे मानधन हे सन २०१४-१५ या वर्षामध्ये रु.१०,०००/- वरील रु.१३,०००/- असे वाढविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### साक्री (जि.धुळे) तालुक्यातील काकशेवड शिवारातील पांझरा नदीवरील कोल्हापूर बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१५) १७०८८ (१४-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील काकशेवड शिवारातील पांझरा नदीवरील कोल्हापूर बंधाराचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण असून उर्वरित काम सुमारे ३ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उर्वरित अपूर्णावस्थेत असलेले काम शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण करणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, धुळे अंतर्गत कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा काकसेवड, ता.साक्री जि.धुळे या योजनेचे मुळ अंदाज पत्रकाय प्रशासकीय मान्यता दिनांक १४ सप्टेंबर, २०११ अन्वये प्राप्त आहे. विभागाचे अहवालानुसार सदर काम बी-१, दिनांक १७ जानेवारी, २०१३ पासुन सुरु करण्यात आले असून कामावर आजपर्यंत रुपये ४३.१७ लाख खर्च झालेला आहे. मा. विधानसभा सदस्य यांनी व स्थानिक ग्रामस्थांनी कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याची तळपातळी वाढविणेबाबत मागणी केल्यानुसार लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, धुळे यांनी सुधारित अंदाजपत्रक तयार केले व मुख्य अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांचे दिनांक १८ जुलै, २०१४ चे पत्रान्वये सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता देण्यात आली असून सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, धुळे यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ चे पत्रान्वये सुधारित प्रशासकीस मान्यतेस्तव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, धुळे यांचेकडे सादर केले आहे. सदर काम सुरु केल्यापासून अडीच वर्षाचा कालावधी झालेला आहे.
(२) उर्वरित काम सुधारित प्रशासकीस मान्यता प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यातील सामाजिक वनीकरणाच्या वतीने कंधार-लोहा तालुक्यातील गावात वृक्ष लागवडीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१६) १७१२९ (१४-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील सामाजिक वनीकरणाच्या वतीने कंधार-लोहा तालुक्यातील अनेक गावात करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीच्या कामात गैरव्यवहार झाला असून मयत मजूराला मस्टरवर जिवंत दाखवून त्याची मजूरी गिळंकृत करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सामाजिक वनीकरणाच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) श्री.माधव गोटू राठोड ग्राम रोजगार सेवक हे चौकशी अंती दोषी आढळून आले आहेत. दि.१/०७/२०१५ ते १२/०७/२०१४ या कालावधीत ग्राम रोजगार सेवक यांनी हजेरी पटात कै.श्रीमती गंगाबाई रामधन राठोड रा.चांडी, ता.लोहा, जि.नांदेड यांचे नाव चुकीचे दाखविण्यात आले हे चौकशी अंती सिध्द झाले. परंतु या कालावधीची एकूण रु.२०१६/- तहसिलदार लोहा यांनी कै.श्रीमती गंगाबाई रामधन राठोड यांच्या ICICI बँकेत असलेल्या खात्यावर जमा करण्यात आली होती. सदर रक्कम ICICI बँकेकडून शासकीय खात्यातपुन्हा जमा करण्यात आली आहे. सदर रक्कम रु.२०१६/- उचल करण्यात आली नाही. त्यामुळे मजूरी रकमेचा दुरुपयोग झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि हजेरी सेवक श्री.माधन राठोड ह्यांनी चुकीच्या पध्दतीने नाव हजेरी पटात दाखला केल्याने त्यांना चौकशी अंती दोषी मानून त्यांच्या सेवा समाप्त केल्या आहेत.

(४) ग्राम रोजगार सेवकाची सेवा दि.१/९/२०१५ रोजी समाप्त केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.५७६७ न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणात जो न्यायालयीन निर्णय होईल त्यास अधिन राहून कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील कोळगांव येथील स्थानिक विकास कार्यक्रम मधील मंजूर कामाबाबत

**(१७) १७२७१ (१४-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील कोळगांव बु.तालुका मालेगांव येथे चंद्रशेष महाराज मंदिराजवळ सामाजिक सभागृहाचे बांधकामास आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) मधुन सन २०१३-१४ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या अद्यापही निविदा काढण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे संपूर्ण निधी वितरीत केला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सभागृहाचे बांधकाम पूर्ण न होण्यास कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०९-२०१५)** :(१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) सदर कामाची निविदा सूचना, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम, यांनी तीनदा प्रसिध्द केली. तथापि कंत्राटदाराचा प्रतिसाद मिळाला नाही.
(५) कंत्राटदारांनी प्रतिसाद न दिल्याने काम कार्यान्वित करता आले नाही.

---

**२५० हेक्टर पर्यंतच्या जलसंधारणाच्या कामांबाबत**

**(१८) १७२८७ (१४-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सध्याच्या राज्यशासनाने तीन सदस्यीय समिती स्थापन केली असून ही समिती जलसंधारणाची अजून सुरु न झालेल्या कामासंदर्भात अहवाल देणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंधारणाची यापूर्वी मंजूरी मिळालेली कामे परंतू अद्यापही सुरु न झालेल्या २५० हेक्टरपर्यंतची सर्व कामे किती उपयोगी आहेत याची तपासणी करणार असुन विदर्भातील कामांना यातून वगळण्यात येणार आहे या सर्व गोष्टीमुळे जलसंधारणाची कामे रद्द होण्याची शक्यता असल्यामुळे शेती व पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न रेंगाळणार आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक ८ मे, २०१५ अन्वये दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या ज्या योजनांची निविदा प्रक्रिया चालू/पूर्ण झाली आहे. ज्या योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. परंतु कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. व प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत परंतु पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नाही अशा सर्व योजनांची (० ते २५० हेक्टर) तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तीन मुख्य अभियंता यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. समितीचा अहवालानुसार याबाबत शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील महादेव मठ या ब्रिटीश कालीन बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत.**

**(१९) १९१९९ (१७-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील महादेव मठ या ब्रिटीश कालीन बंधाऱ्याच्या उजव्या बाजुच्या जमीनीची धुप होवून नुकसान झाल्यामुळे सदर बंधारा दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध नसल्याने बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे दुरुस्ती करण्याबाबत येथील लोक प्रतिनिधी वारंवार शासनाकडे मागणी करत असुन त्यासंबंधीचे पत्र त्यांनी स्वत: मा.जलसंधारण मंत्री यांना दिनांक २० जुलै, २०१२ दिले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-११-२०१५) :**(१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील महादेव मठ या ब्रिटीश कालीन बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता रु. ३१.८४ लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला आहे.

नाशिक विभाग विकास कार्यक्रमांतर्गत शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांकरिता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेमध्ये या प्रस्तावांना निधी देण्याची बाब शासनाने विचाराधीन आहे.

---

**मौजे-बोरीचामाळ, पोस्ट-तळेगांव (ता.तळा, जि.रायगड) येथे जलसंधारण विभागाअंतर्गत पक्या स्वरुपाचा आर.सी.सी.बंधारा होणेबाबत**

**(२०) १९६४१ (१४-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)मौजे-बोरीचामाळ, पोस्ट-तळेगांव,( ता.तळा,जि.रायगड ) येथे जलसंधारण विभागाअंतर्गत पक्या स्वरुपाचा आर.सी.सी.बंधारा होणेबाबत या विषयावरील दिनांक ७ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंधारण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय.
(२) सदर निवेदनाचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, कळवा-ठाणे विभागाकडून प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार ४० मी. लांबी, ३.०० मी उंच व १५ ते २० सघमी पाणीसाठा होईल. सविस्तर सर्वेक्षण अंदापत्रकाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बांबरुड बु. (ता.भडगांव, जि.जळगांव) परिसरातील ओल्या वृक्षांची तोड केल्याबाबत**

**(२१) १९७५४ (१७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांबरुड बु. (ता.भडगांव, जि.जळगांव) परिसरात माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ओल्या वृक्षांची सर्रास तोड केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी तेथील नागरिकांनी वारंवार संबधितांकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वृक्षतोडीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) वन विभाग तसेच महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकसंचलित साधन केंद्राला (सीएमआरसी) दिला जाणारा ७० टक्के निधी गेल्या सहा महिन्यापासून न मिळल्याबाबत**

**(२२) १९७६३ (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला बचतगट चळवळ सक्षम करण्यासाठी राज्य शासनाच्या महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत चालविल्या जाणारे लोकसंचलित साधन केंद्राला (सीएमआरसी) दिला जाणारा ७० टक्के निधी गेल्या सहा महिन्यापासून न मिळल्याने राज्यातील ३१५ लोकसंचलित साधन केद्रांतील शेकडो कर्मचा-यांचे मानधनही रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या केंद्रातील शेकडो कर्मचा-यांचे मानधनही अद्याप मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) अघाप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-१०-२०१५) :**(१) व (२) महिला व आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांचेमार्फत तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम ही योजना आयफॅड या आंतरराष्टीय संस्थेच्या अर्थसाहाय्याने राज्यामध्ये राबविण्यात येत असून, तेजस्विनी कार्यक्रमांतर्गत लोकसंचलित साधन केंद्रे (सीएमआरसी) स्थापन करण्याच्या आयफॅडच्या मार्गदर्शन सूचना असल्याने माविमने सन २००७-०८ पासून सीएमआरसी स्थापनेची सुरुवात

केली माविमने आतापर्यंत स्थापन केलेली लोकसंचलित साधन केंद्रांची संख्या ३१५ नसून फक्त २३६ एवढया सीएमआरसी स्थापना केल्या आहेत. सदर सीएमआरसी या स्वंयचलित संस्था असून त्यांनी संस्था टिकविण्यासाठी स्वत: स्वबळावर काम करुन निधी उभा करावयाचा आहे. तथापि सुरुवातीला अशा सीएमआरसी स्थापना करण्यासाठी काही वर्षापर्यंत त्यांना निधी देण्यत येणार होता. त्यानुसार तेजस्विनी कार्यक्रमांतर्गत सीएमआरसीना सन २०११-१२ पर्यंत १००% व त्यानंतर सन २०१२-१३ मध्ये ९०% सन २०१३-१४ मध्ये ७०% व सन २०१४-१५ मध्ये ५०% याप्रमाणे घसरत्या क्रमाने निधी देण्यात आला असून यानंतर प्रत्येक सीएमआरसीना त्यांची संस्था कार्यरत ठेवण्याची जबाबदारी त्यांची आहे.

सीएमआरसी चे उत्पन्न मिळण्याकरिता माविमने त्यांचे बिझनेस प्लॅन तयार केलेले आहेत. परंतु ज्या सीएमआरसींनी बिझनेस प्लॅनची पूर्तता केली नाही अशा सीएमआरसींना उत्पन्न मिळण्यास अडचणी आल्या आहेत. त्यामुळे ३३ सीएमआरसींचे १ किंवा २ महिन्यांचे मानधन होऊ शकलेले नाही.

(३) व (४) ज्या सीएमआरसी दुर्गम भागामध्ये आहेत अशा ठिकाणी स्टाफ मिळणे व टिकवण्यासाठी अडचणी येत आहेत. अशा सर्व प्रकारच्या सीएमआरसींचा माविममार्फत आढावा घेतला असता त्यांना मानधन मिहावे या दृष्टीने माविमने त्यांना मानधनापोटी लागणारी रक्कम बिनव्याजी कर्जरुपाने दिलेली आहे. तसेच अशा सीएमआरसींना उत्पन्न न मिळण्याचे कारण तेथील व्यवस्थापक व सहयोगिनी याची अकार्यक्षमता हा सुध्दा एक घटक आहे. त्याकरिता या सीएमआरसींना आर्थिक Handholding support देखील माविममार्फत देण्यात येत आहे.

सीएमआरसी या संस्था स्वबळावर चालवावयाच्या असल्याने त्यांच्या स्टाफच्या मानधनाचे उत्तरदायित्व त्यांच्या व्यवस्थापन व स्टाफवर असून राज्य शासनावर नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील कृषी विभागाच्या वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण निविदा प्रक्रिया थांबविण्याबाबत.**

**(२३) १९७६६ (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील कृषी विभागाच्या वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण निविदा प्रक्रिया थांबविण्याचे आदेश उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार सदर निविदा प्रक्रिया थांबविण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेत कोणता गैरव्यवहार झाला व त्यांची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यांस जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्याक्रमांतर्गत सन २०१४-१५ साठी अशासकीय/स्वयंसेवी संस्था प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा म्हणून निवडसूची तयार करण्याची प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी प्राप्त झालेलया आदेशानुसार करण्यात आली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. सदरचे प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.३१/०७/२०१५ च्या आदेशान्वये निकाली काढले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील खाड्यांच्या परिसरात तीवरांच्या झाडांचे सवंर्धन करण्याचे धोरणास छेद देऊन ठाणे-घाटकोपर या परिसरातील राखीव खार जमिनीवर निवासी संकूल उभारण्याच्या शासनाच्या धोरणाबाबत**

**(२४) २०५०२ (१४-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निसर्गाचा व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ठाणे जिल्हयातील खाड्यांच्या परिसरात तीवरांच्या झांडांचे सवंर्धन करण्याचे धोरणास छेद देऊन ठाणे-घाटकोपर या परिसरातील राखीव खार जमिनीवर निवासी संकूल उभारण्याचे शासनाने धोरण आखले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर ठिकाणी यापुर्वीच भू-माफीयांनी तीवरांची तोड करुन खाडयांचे मुळ प्रवाह भूमाफियांनी भराव टाकून बंद केल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) निसर्गाचा असमतोल वाढविणा-या अशा घटनांना शासन पायबंद घालण्यासाठी ठोस कारवाई करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५) :**(१) मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.३२३६/२०१४ रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिलेलया निर्णयानुसार कांदळवन व कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. अंतरापर्यंत बांधंकाम प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. तसेच याबाबत राज्याचे गृहनिर्माण धोरण अद्याप निश्चित झाले नाही.

(२) हे खरे नाही. मौजे मुलुंड, नाहुर, कांजुरमार्ग, भांडूप, विक्रोळी व घाटकोपर या भागातील सरकारी जमिनीवरील परिसरात १०१४.७८४७ हे. आर कांदळवन क्षेत्र राखीव वन म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. राखीव वने म्हणून अधिसूचित झालेले वर नमूद परिसरातील क्षेत्र माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये ठाणे वन विभागाकडून कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत होण्या पूर्वीपासून काही क्षेत्रात भराव करुन अतिक्रमण केल्याचे दिसून आलेले आहे. तसेच मौजे घाटकोपर सर्वे क्र.१९४ येथे तीन कांदळवन वृक्षांची तोड करुन मातीचा भराव केल्याचे दिसून आलेले आहे. सदर घटने विरुध्द वन गुन्हा क्र.६ सी/२०१५-१६, दि.२९.०६.२०१५ अन्वये नोंद घेतलेली असून चौकशी चालू आहे. मौजे विक्रोळी, कन्नमवारनगर, घाटकोपर मधील क्षेत्र या विभागाकडे हस्तांतरण करण्यापूर्वी असणाऱ्या अनुक्रमे ५८० व १०० झोपडपट्ट्यांची चौकशी करुन कायदेशीर कार्यवाही करण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(३) मुंबई कांदळवन संधारण घटकाकडून पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) मुंबई, नवी मुंबई परिसरातील शासकीय संरक्षित/राखीब वनांच्या हद्दी निश्चित करुन बुरुज टाकण्याचे काम वन विभागामार्फत करण्यात आले.

२) कांदळवनाच्या सरंक्षणासाठी एक स्पीड बोट खरेदी करुन कांदळवन क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते.

३) मसहूल विभाग, महानगरपालिका व पोलीस विभाग यांच्या सहकार्याने विविध ठिकाणचे अतिक्रमण हटविण्याचे कार्यवाही करण्यात येते.

४) जनजागृतीसाठी ठिकठिकाणी कांदळवन संरक्षणासाठी फलक लावण्यात येते.

५) जनजागृतीसाठी विविध ठिकाणी कार्यशाळा, चित्रकला स्पर्धा, वन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, लोकसहभागातून रोपवन कार्यक्रम इत्यादी कार्यक्रामचे आयोजन करण्यात येते.

---

**शासनाने ठरवून दिलेल्या क्षेत्रात अंगणवाड्यांसाठी हक्काची जागा मिळत नसल्याने अनेक बचत गटधारक कर्जबाजारी झाल्याबाबत**

**(२५) २०९५८ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जाचक अटी व पात्र उमेद्वार मिळत नसल्याने रिक्त असलेली पदे तसेच निधी उपलब्ध असूनही केवळ दिलेल्या क्षेत्रात जागा मिळत नसल्यामुळे अंगणवाडया भाडयाच्या खोलीत किंवा समाज मंदीरात भरवाव्या लागत असल्याने व अनेक बचत गटधारक कर्जबाजारी झाल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ठरवून दिलेल्या क्षेत्रात अंगणवाडयांसाठी हक्काची जागा मिळत नसल्यामुळे ३१९९ पैकी १ हजार १२० अंगणवाडया भाडयाच्या खोलीत, समाजमंदीर किंवा ग्रामपंचायत कार्यालयात भरत आहेत तसेच उमेदवार मिळत नसल्याने रिक्त असलेले पदे प्रकल्प स्तरावर भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग क्रमांक २ ते ३ बाबत शासनाने चौकशी करुन प्रकल्प स्तरावर रिक्त असलेली किती पदे भरण्यासाठी व अंगणवाडयांसाठी हक्काची जागा मिळण्यासाठी तसेच सदर जाचक अटी शिथील करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

अंगणवाडी इमारत बांधण्यासाठी प्रकल्प स्तरावरुन प्रयत्न केले जातात. इमारत बांधण्यासाठी अपेक्षित जागा मिळाल्यानंतर तसे प्रस्ताव संबंधित जिल्हा परिषदेच्या स्तरावर तयार केले जातात व त्या कामासाठी डी.पी.डी.सी. नाबार्ड, मानव विकास मिशन, इत्यादी

स्त्रोतातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावरुन करण्यात येत आहे. अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना चांगल्या दर्जाचे पुर्व प्राथमिक शिक्षण मिळावे या उद्देशाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे शैक्षणिक पात्रतेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

(३) अंगणवाड्यासाठी हक्काची जागा मिळण्यासाठी सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) जिल्हा परिषद व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अंगणवाडी बांधकामाकरिता जागा उपलब्ध असल्यास बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. प्रकल्प स्तरावरील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी अट शिथिल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रोहीणखेड व कोथळी (ता.मोताळा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रस्तावाबाबत**

**(२६) २१०९५ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासाठी २००० रुग्ण खाटांचा अनुशेष असल्याची बाब खरी आहे काय,

(२) असल्यास याअनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात मौजे कोथळी व रोहिणखेड येथील प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत काय,

(३) असल्यास सदर प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास शासनाची भुमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विमानतळावरुन दुर्मिळ कासवाची तस्करी करणाऱ्या दोन व्यक्तींना हवाई गुप्तचर विभागाने अटक केल्याबाबत**

**(२७) २१५४१ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळावरुन दुर्मिळ १८३ कासवाची तस्करी करणा-या दोन व्यक्तींना हवाई गुप्तचर विभागाने अटक करुन कासवाची सुटका केल्याची घटना दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कासवाची तस्कर करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,
(२) सदर प्रकरणात कस्टम विभागाने कस्टम अधिनियम १९६२ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम अंतर्गत पकडलेले आरोपी व मुद्देमालाचा पंचनामा, जबाब तयार करुन वन विभागाच्या ताब्यात दिले. सदर आरोपी विरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९, ३९, ४८अ, ४९ व ५१ नुसार गुन्हा नोंदविण्यात येऊन आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. सद्य:स्थितीत आरोपींना जामिनावर मुक्त करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद् भवत नाही.

---

**बुरंबाळ, बर्की, गावडी, भंडारवाडी (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) या लघुपाटबंधारे तलावाचे काम अनेक वर्षे अपूर्णा अवस्थेत असल्याबाबत**

**(२८) २१८२२ (१४-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुरंबाळ, बर्की, गावडी, भंडारवाडी (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) या लघुपाटबंधारे तलावाचे काम अनेक वर्षे अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत सुधारित प्रशासकिय मान्यतेचा प्रस्ताव जलसंधारण विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही योजना मापदंडाबाहेर जात असल्यामुळे सुधारित प्रशासकिय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेला लागू केलेला आर्थिक मापदंड सन २००९/१० मधील निश्चित केलेला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे विभागाला सुधारित मापदंड लागू करणेविषयी शासन तातडीने कार्यवाही करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) नाही.
तथापि, प्रकल्पांचे माती धरणाची कामे पूर्ण असून अनुषंगिक (कालवा इ.) कामे प्रगतीत आहे.
(२) नाही.

तथापि, सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये एकात्मिक पाणलोट अंतर्गत कामांची अंदाजपत्रके, संकल्पचित्र इत्यादी तयार न करता अशासकीय पध्दतीने ही कामे पूर्ण केल्याबाबत**

**(२९) २१८४८ (१७-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यांमध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेअंतर्गत ८ गावांची निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये सपाटीकरण बंधारे इत्यादी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांचे कोणतेही अंदाजपत्रके, संकल्पचित्र इत्यादी तयार न करता अशासकीय पध्दतीने ही कामे पूर्ण करुन, त्यांची बिले अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सर्व कामांची चौकशी त्रयस्त यंत्रणेमार्फत शासन करणार आहे काय,

(५) असल्यास, दोषी अधिका-यांवर कारवाई करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये सन २०१३-१४ मध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेंतर्गत १५ गावांची निवड करण्यात आली असून सदर गावांमध्ये अद्याप कोणत्याची बाबीवर खर्च झालेला नाही. तसेच सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये कोणत्याही गावांची निवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर गावांमध्ये कामाची अंदाजपत्रके, संकल्पचित्र हे. तयार न करता अशासकीय पध्दतीने कोणतेही कामे पूर्ण करुन त्यांची बिले अदा करण्यात आलेली नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहूवाडी तालुक्यात (जि.कोल्हापूर) येथे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेत झालेल्या अपहाराबाबत**

**(३०) २१८४९ (१७-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूवाडी तालुक्यामध्ये (जि.कोल्हापूर) सन २०१३-१४ सन २०१४-१५ सन २०१५-१६ मध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेतंर्गत ९ गावांची निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये सपाटीकरण बंधारे इत्यादी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांचे कोणतेही अंदाजपत्रके, संकल्पचित्र इत्यादी तयार न करता अशासकीय पध्दतीने ही कामे पूर्ण करून त्यांची बिले अदा करण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सर्व कामांची चौकशी त्रयस्त यंत्रणेमार्फत शासन करणार आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५)** :(१), (२) व (३) शाहूवाडी तालुक्यामध्ये सन २०१३-१४ मध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्याक्रमांतर्गत ३७ व सन २०१४-१५ मध्ये १० गावांची निवड झाली असून सदर गावांमध्ये अद्याप कोणत्याही बाबीवर रक्कम खर्च झाली नाही. त्यामुळे सदर गावांमध्ये कामांची अंदाजपत्रके, संकल्पचित्र इ. तयार न करता अशासकीय पध्दतीने कोणतेही कामेपूर्ण करुन त्याची बिले अदा करण्यात आलेली नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील निवड झालेल्या पाच पात्र महिला बचत गटास नविन अटीमुळे टीएचआर पुरवठ्याचे कार्यादेश न मिळाल्याबाबत**

**(३१) २२३८३ (१४-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील निवड झालेल्या पाच पात्र महिला बचत गटास/महिला मंडळास नविन अटीमुळे अद्याप टीएचआर पुरवठ्याचे कार्यादेश न मिळाल्याने त्यांच्यावर अन्याय होत असून आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात मा.ऊर्जा मंत्री तथा पालकमंत्री, नागपूर यांनी दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे नियमानुसार कार्यवाही करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालकमंत्री यांच्या पत्रानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-११-२०१५)** :(१) नागपूर जिल्ह्यात निवड झालेल्या पाच महिला बचत गट महिला मंडळ यांना जिल्हास्तरीय आहार समितीने THR उत्पादन केंद्र स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. तथापि सदर महिला बचत गट महिला मंडळ यांचे THR उत्पादन केंद्र तपासणीबाबत वेळोवेळी प्राप्त झालेल्या निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आहार समितीने आयुक्तालयाकडे मार्गदर्शन मागविले आहे. घरपोच आहार (THR) चा पुरवठा करण्यासाठी पात्र ठरलेल्या परंतु अद्यापपर्यंत पुरवठा आदेश न दिलेल्या ६४ महिला बचत गटांना निविदेतील अटी व शर्तीच्या अधीन राहून कार्यादेश देण्याबाबत दि.२५/८/२०१५ च्या शासन पत्रान्वये

कळविण्यात आले असून त्याप्रमाणे आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय आहार समिती यांना कळविले आहे.

THR साठी Extruction Technology सह Automatic Plant ची आवश्यकता आहे. किंवा कसे, याबाबत केंद्र शासनाने दि.०३/०९/२०१५ च्या पत्रान्वये त्यांचे अभिप्राय कळविले आहे. सदरचे अभिप्राय अधिक स्पष्ट करण्यासाठी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांचे कायदेशीर अभिप्राय मागविले असून सदर अभिप्राय प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) यासंदर्भात मा.मंत्री, उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा तथा पालकमंत्री यांनी मा.मंत्री, महिला व बालविकास यांना नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत दि.०१/०६/२०१५ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(३) सदर पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हा रुग्णालयामध्ये वीज खंडीत होण्याच्या वाढत्या प्रकारामुळे रुग्णांचे होणारे हाल**

**(३२) २२५२५ (१७-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा रुग्णालयामध्ये वीज खंडीत होण्याचे प्रकार वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयामध्ये वीज नसल्यामुळे रुग्णांचे हाल होत असून कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जनरेटर सुविधा असुन ही विनावापर पडलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे संपूर्ण रुग्णालयामध्ये येणारे सर्व स्थानिक रुग्णांचे अतोनात हाल होत आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने तातडीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

विज पुरवठा खंडित झाल्यास जनरेटरची पर्यायी सुविधा उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

जनरेटरची सुविधा उपलब्ध असून ती सद्य:स्थितीत कार्यरत आहे.

(४) हे खरे नाही.

पर्यायी सुविधा उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई तालुक्यातील इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र**
**लाभार्थ्यांना घरकुले मिळाली नसल्याबाबत**

**(३३) २२७७० (१४-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यात (जि.पालघर) काही वर्षापुर्वी ग्रामीण भागातील दारीद्र्य रेषेखालील कुटुंबाचा निवारा प्रश्न सोडविण्यासाठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत अर्नाळा, कसा व रानगाव या गावात उपरोक्त योजनेअंतर्गत प्रत्यक्ष पात्र लाभार्थ्यांना घरकुल न मिळता अपात्र व धनदांडग्याचा समावेश दारिद्र रेषेखालील कुटुंबाच्या यादीत करुन यामध्ये खुप मोठा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची काय चौकशी केली आहे व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणात जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) नाही.

सन २००२-२००७ च्या दारिद्र्य रेषेखालील सर्वेनुसार अर्नाळा व रानगाव ग्रामपचायतीमध्ये तयार करण्यात आलेली इंदिरा आवास योजनेची प्रतिक्षा यादी, लाभ दिलेले लाभार्थ्यी शिल्लक लाभार्थी, अपात्र लाभार्थी यांची संख्या खालीलप्रमाणे-

| ग्राम पंचायतीचे नाव | २००२-०७ BPL लाभार्थी संख्या | प्रतिक्षा यादीत समाविष्ट लाभार्थी संख्या | २००६-०७ ते २०१४-१५ पर्यत लाभ दिलेले लाभार्थी संख्या | शिल्लक लाभार्थी | जागा नसणे, पक्के घर, स्थलांतर या कारणामुळे अपात्र लाभार्थी | सन २०१५-१६ मध्ये लाभ देण्यास पात्र लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्नाळा | ७३४ | ५८१ | १४६ | ४३५ | ४२९ | ६ |
| रानगांव | २२७ | २०९ | १०९ | १०० | ७४ | २६ |

कसा ग्रामपंचायत वसई तालुक्यात समाविष्ट नसल्यंमुळे त्या ग्रामपंचायतीची माहिती देण्यात आलेली नाही. अर्नाळा व रानगांव ग्रामपंचायतीमधील लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे व दारिद्र्य रेषेखालील यादीत धन-दांडग्या लाभार्थ्यांचा समावेश करुन आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याबाबतची बाब अर्नाळा व रानगांव ग्रामपचायती मध्ये व पंचायत समिती कार्यालय, वसई येथे निदर्शनास आलेली नाही. सद्यस्थिती पात्र असलेल्या ३२ लाभार्थ्यांना सन २०१५-१६ मध्ये घरकुलांचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे झर्ये धनगरवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाझर तलावाच्या बांधकामाच्या मंजूरीबाबत**

**(३४) २२९५४ (१७-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झर्ये धनगरवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाझर तलावाच्या बांधकामास सुधारित प्रशासकिय मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाच्या बांधकामास किती निधीची तरतूद करण्यात आली आहे, सदर कामाची निविदा काढण्यात आली आहे काय,

(३) तसेच सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याबाबतच्या प्रस्तावावर विभागाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून त्रुटी पूर्तता अहवाल मागविला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनुबाई शिवारात (जिल्हा बुलढाणा) पाझर तलावाचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम**

**(३५) २२९७३ (१७-०९-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणी अडवा पाणी जिरवा या योजनेअंतर्गत मनुबाई शिवारात (जिल्हा बुलढाणा) ४ वर्षापूर्वी पाझर तलाव मंजूर केला असून सदर तलावाचे काम भूसिंचन विभागाने सिंदखेडराजा येथील ठेकेदार श्री.चव्हाण याला देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदाराने मनमानी कारभार करुन भिंतीच्या कामात काळ्या मातीचा वापर न करता मुरुमाचा वापर केल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत भिंतीच्या पिचींगचे काम सुरु असून पिचिंगच्या कामासाठी पक्का दगड न वापरता कच्चा दगडाचा सर्रास वापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, तद्नुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषी ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

तथापि, गाभा क्षेत्रामध्ये काळ्या मातीचा व आवरण क्षेत्रास मुरुमाचा वापर केलेला आहे, हे काम शासकीय मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, पिचींगसाठी पक्का दगड वापरुन सदर काम हे शासकीय मानकाप्रमाणे गुणवत्तेनुसार करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलयुक्त शिवार या योजनेमध्ये सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा व पलूस तालुक्यातील गावांचा समावेश नसल्याबाबत

**(३६) २३३७८ (१४-०८-२०१५). श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार या योजनेमध्ये सांगली जिल्ह्यातील पाणी टंचाई असलेल्या शिराळा, वाळवा व पलूस तालुक्यातील गावांचा समावेश केला गेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासन या तालुक्यातील गावांचा नव्याने या योजनेमध्ये समावेश करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) शिराळा, वाळवा व पलुस तालुक्यातील गावे गाव निवडीच्या निकषांत बसत नसल्याने सदर तालुक्यातील गावांचा सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेला नाही.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत दरवर्षी ५००० प्रमाणे एकुण २५,००० गावे टंचाई मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून सन २०१५-२०१६ करिता ६२०२ गावांची गाव निवडीच्या निकषानुसार निवड केली आहे, तसेच सन २०१९ पर्यत प्रत्येक वर्षी गावे गाव निवडीच्या निकषानुसार निवडण्यात येणार आहेत.

---

## रामटेक तालुक्यातील जलयुक्त शिवार या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३७) २३९६१ (१७-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील झींझुरीया गावाजवळील कोल्हापुरी बांध जलयुक्त शिवार योजनेतंर्गत नाल्यातील रेती अवैधरित्या कृषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने विकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या कामामध्ये तहसिल कृषी अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक नागरीकांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंगणवाडी सेविकाचे मानधन नविन बी.डी.एस.प्रणाली आल्यामुळे उशीरा मिळत असल्याबाबत**

**(३८) २४०८९ (१४-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंगणवाडी सेविकाचे मानधन नविन बी.डी.एस.प्रणाली आल्यामुळे ३ ते ४ महिन्यापासून उशीरा मानधन मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांचे संपूर्ण कुटुंब त्या मानधनावर अवलंबून असल्यामुळे त्यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने या अंगणवाडी सेविकांसाठी उपाययोजना केल्या आहेत काय,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर येथील सुधारगृहातील निराधार महिला व मुलांना पुरेसे व सकस जेवण देण्याबाबत**

**(३९) २४१४८ (३०-०७-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनामार्फत उल्हासनगर येथे चालविल्या जाणाऱ्या निराधार महिला व त्यांच्या सोबत असलेल्या मुलांना प्रती व्यक्ती एका वेळी जेवणाचे प्रमाण काय विहित करण्यांत आले आहे,

(२) असल्यास, उल्हासनगर येथे असलेल्या सुधारगृहातील २९ महिला व त्यांच्या सोबत असलेल्या ५ निराधार मुलांना दिनांक १९ मे, २०१५ रोजी केवळ अडीच किलो तांदूळाचा भात जेवणाचे वेळी देण्यांत आला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे, उक्त सुधारगृहातील निराधार महिला व त्यांच्या मुलांना पुरेसे व सकस जेवण देण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५)** :(१) दिनांक ०९.०८.२००६ च्या शासन निर्णयानुसार प्रती महिलांसाठी एका वेळेला गहू, तांदूळ मिळून ४५० ग्रॅम, डाळी व कडधान्य मिळून ८० ग्रॅम, पालेभाजी/फळभाजी २०० ग्रॅम, दूध २५० मिलीग्राम व वयोगट ६ महिने ते १ वर्षाच्या बालकांसाठी एका दिवसासाठी प्रती मूल तांदूळ नाचनी १० ग्रॅम, डाळ ५ ग्रॅम, दूध ८०० मिलीग्रॅम व भाज्या २० ग्रॅम असे प्रमाण आहे. तसेच वरील शासन निर्णयानुसार वयोगट २ ते ३ वर्षाच्या बालकांसाठी अनुक्रमे १६० ग्रॅम, ४० ग्रॅम, ५० ग्रॅम, व ५०० ग्रॅम, वयोगट ४ ते ६ वर्षाकरिता २५० ग्रॅम, ६० ग्रॅम, १०० ग्रॅम,व ३५० ग्रॅम, वयोगट ७ ते १० वर्षाकरिता ३०० ग्रॅम, ७०ग्रॅम, १५० ग्रॅम व १५० ग्रॅम आणि वयोगट ११ ते २० वर्षाकरिता ४५०ग्रॅम, ८०ग्रॅम, २००ग्रॅम व ३०० ग्रॅम असे प्रमाण आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून, संस्थेतील प्रवेशितांना शासनाने विहित केलेल्या प्रमाणानुसार व आवडीनुसार आहार देण्यात येतो असे निदर्शनास आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील अंगणवाड्या व मिनी अंगणवाड्यातील सुमारे ४ हजारे कर्मचा-यांचे पगार गेल्या सहा-सात महिन्यापासून झाले नसल्याबाबत**

**(४०) २४३५७ (१७-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अंगणवाड्या व मिनी अंगणवाड्यातील सुमारे ४ हजार कर्मचा-यांचे पगार गेल्या सहा-सात महिन्यापासून झाले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अंगणवाडी कर्मचा-यांचे पगार थकित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कर्मचा-यांना त्यांचे थकित पगार तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-११-२०१५) :**(१) हे खरे आहे,
(२) अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०१४ अन्वये दिनांक ०१/०४/२०१४ पासून अनुक्रमे ९५०/-, ५५०/- व ५००/- अशी वाढ करण्यात आली आहे, तथापि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता या बाबीसाठी तरतूद उपलब्ध झालेली नसताना वाढीव दराने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन अदा करण्यात आल्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमित मानधन अदा करणे प्रलंबित होते.
(३) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे मानधन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, सद्य:स्तितीत अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २०१५ पर्यत मानधन अदा करण्यात आलेले आहे, तसेच माहे सप्टेंबर, २०१५ चे मानधन तातडीने अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तापोळा (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) विभागातील गावांना**
**इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळण्याबाबत**

**(४१) २४४०९ (३१-०७-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तापोळा (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) विभागातील ५६ गावे ही सन २००६ साली जावळी तालुक्यातून महाबळेश्वर तालुक्यात समाविष्ट झाली असून ही पूर्णत: कोयना धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांना अद्यापही शासनाने गावठाण व तत्सम योजना पुरवल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम घाटामधील इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून जाहिर करण्यात आलेल्या गावांमधील बागायत शेतीचे क्षेत्र वगळण्यात येणार असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या बैठकीमध्ये ठराव झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मा. कस्तुरीरंगन समितीच्या शिफारशीनुसार प्रश्न भाग (१) मधील विभागातील गावांना इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समावेश केल्यास सदर गावांचा विकास करण्यास अनेक अडचणी निर्माण होणार आहेत व याबाबतचे निवेदन महाबळेश्वर दर्शन कृषि पर्यटन सेवा सह. संस्था मर्यादित, सातारा यांनी मा.मुख्यमंत्री, यांना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर निवेदनानुसार सदर गावांना इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे व सदर गावांना गावठाण व तत्सम योजना पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०१५) :**(१) व (२) सन २००६ साली जावळी तालुक्यातील ५६ गावे महाबळेश्वर तालुक्यातील समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यापैकी ४४ गावे ही कोयना धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त आहेत.

सदर ४४ गावांना काही नागरी सुविधा पुरविण्यात आल्या असून उर्वरित नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) डॉ. के. कस्तुरीरंजन यांच्या अहवालानुसार तापोळा भागातील ५६ पैकी ४६ गावे परिसंवेदनशिल क्षेत्राच्या यादीत समाविष्ट आहेत. सदर गावांच्या क्षेत्र पडताळणीचे काम झालेले आहे, त्यापैकी ३५ गावांचे फक्त नैसर्गिक परिसर (natural landscape) क्षेत्र परिसंवेदनशिल क्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(५) इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समावेश केल्यास सदर गावांचा विकास करण्यात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत अशा आशयाचे निवेदन महाबळेश्वर दर्शन कृषि पर्यटन सेवा सह. संस्था मार्यादित, सातारा यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे जून, २०१५ मध्ये दिले आहे.

(६) पश्चिम घाट हा परि-संवेदनशिल क्षेत्र म्हणून घोषित करणे केंद्र शासनाकडून अपेक्षित आहे. त्या अुनषंगाने अद्याप अंतिम अधिसूचना अद्याप जारी करण्यात आलेली नाही.

---

## नाशिक जिल्हयातील मालेगांव व नांदगांव तालुक्यातील अंगणवाडया इमारती अभावी मंदिरांच्या ओटयावर भरत असल्याबाबत

**(४२) २४४४५ (१७-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मालेगांव व नांदगांव तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मालेगांव व नांदगांव (ग्रामीण) या कार्यालयाअंतर्गत असलेल्या अनेक अंगणवाड्या इमारती अभावी उघड्यावर, ओट्यावर, मराठी शाळेंच्या ओट्यावर व मंदिरांच्या ओट्यावर भरत असल्याने अंगणवाडीतील विद्यार्थी व अंगणवाडी सेविकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे, चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) असल्यास, उक्त अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबानाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, एकात्मिक माल विकास सेवा योजना प्रकल्प मालेगाव अंतर्गत मंजुर अंगणवाडी केंद्र संख्या ४६६ व नांदगाव अंतर्गत मंजुर अंगणवाडी केंद्र संख्या २०२ आहे त्यापैकी मालेगाव प्रकल्पात ८२ व नांदगाव प्रकल्पात २२ अंगणवाडी केंद्र इमारती अभावी खाजगी घराच्या

ओट्यावर मराठी शाळेच्या ओट्यांवर भरत आहेत. तथापि अंगणवाडीतील विद्यार्थी व अंगणवाडी सेविका यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे अशी परिस्थिती नाही.

(२) खाजगी घरांच्या ओट्यांवर, मराठी शाळेच्या ओट्यावर भरणाऱ्या अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी सन २००९-१० व २०१०-११ या वर्षात बिगर आदिवासी योजना व मानव विकास योजनेअंतर्गत मालेगाव प्रकल्पात १४६ व नांदगांव प्रकल्पात ५३ अंगणवाडी इमारत बांधकामे मंजुर करण्यात आलेली होती पैकी मालेगाव प्रकल्पात ७२ व नांदगाव प्रकल्पात ३४ कामे पुर्ण झालेली आहेत.

तसेच उर्वरित मालेगाव प्रकल्पात ७४ व नांदगाव प्रकल्पात १९ अंगणवाडी इमारत बांधकामाचे साहित्याचे वाढते भाव, मंजुरीची दरवाढ, मजूर संस्थांचा बांधकामे घेण्यास अनुत्साह, नगरपालिका हद्दीत वाढ, इत्यादी कारणामुळे सदरची उर्वरित बांधकामे ही पूर्ण होऊ शकलेली नाहीत.

(३) सन २०१०-११ व २०११-१२ या वर्षातील अंगणवाडी बांधकामासाठी अनुक्रमे रु.४.०० लाख याप्रमाणे शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१० व रु. ४.५० लक्ष प्रमाणे शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, २०११ अन्वये खर्चाची मर्यादा होती. तथापि त्या खर्चाच्या मर्यादेत अंगणवाडी बांधकामे पूर्ण होऊ शकली नाहीत. अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे खर्चाच्या वित्तीय मर्यादेत वाढ करणेबाबत मोठ्या प्रमाणावर मागणी झाल्याने शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१४ अन्वये बिगर आदिवासी क्षेत्राकरिता रु.४.०० लक्ष ऐवजी रु.६.०० लक्ष अशी वाढ करण्यात आलेली आहे. तसेच आदिवासी क्षेत्राकरिता रु.४.५० लक्ष ऐवजी रु.६.६० लक्ष अशी सुधारित दराने अंगणवाडी इमारत बांधकामास मंजूरी दिली आहे.

(४) मालेगाव प्रकल्पातील ७४ व नांदगाव प्रकल्पातील १९ अंगणवाडी केंद्रापैकी अंदाजपत्रकीय दर कमी असल्याच्या कारणास्तव सुरु न होऊ शकलेली कामे व अन्य इतर कारणामुळे सुरु न होऊ शकलेली कामे रद्द करण्यात येऊन शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१४ अन्वये शासनाने मान्यता दिलेल्या सुधारित वित्तीय मर्यादेमध्ये सुरु न झालेल्या कामांना प्राधान्याने निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पाझर तलावाकरिता जिंतूर व सेलु तालुक्यातील (जि.परभणी) शेतक-यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप न मिळाल्याबाबत**

**(४३) २४५४६ (१४-०८-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्तर मार्फत करण्यात येण-या पाझर तलावाकरिता जिंतूर व सेलु तालुक्यातील (जि.परभणी) शेतक-यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना जमिनीचा मोबदला अद्याप देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच शेतक-यांना जमिनीचा मोबदला त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

रोजगार हमी योजनेंतर्गत लघुसिंचन जलसंधारण यंत्रणेने हाती घेतलेल्या १२० पाझर तलावांपैकी ४७ पाझर तलावांच्या भूसंपादनाचा मोबदला, जिल्हाधिकारी परभणी यांचेकडून संबंधितांना अदा झालेला आहे. उर्वरित ७३ प्रकल्पांचा भूसंपादन मोबदला अदा करण्यासंबंधीची कार्यवाही जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे सुरु आहे.

---

### मौजे किर्लोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील गडनदीच्या पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(४४) २४८५० (३०-०७-२०१५). श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किर्लोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील गडनदीला बंधारा व पूल असून पावसाच्या दिवसामध्ये नदीला पूर आल्यास वाहतूक बंद होते व गावांचा संपर्क तुटतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधा-याची उंची वाढविल्यास नदीला पूर आल्यास वाहतूक बंद होणार नाही व वाहतूक सुरक्षित चालू राहील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुलाची उंची लवकरात लवकर वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे अंतर्गत असलेल्या कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी या विभागाचा गडनदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा असून यावरुन ग्रामस्थ वाहतूक करतात. पावसाळ्यामध्ये नदीला पूर आल्यास कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पाण्याखाली जातो. त्यावेळी गडनदीवर बंधाऱ्याच्या खालील बाजूस ३ कि.मी. अंतरावतील बेळणा येथील पुलावरुन मौजे असगणे मार्गे वाहतूक सुरु राहाते. सदर पुल हा सार्वजनिक बांधकाम खात्याचा पुल आहे. त्यामुळे मौजे किर्लोसच्या रहिवाशांचा पावसाळ्यामुळे संपर्क तुटत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) मौज हिरलगे-कोवाडे बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४५) २५५५३ (१७-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) मौज हिरलगे-कोवाडे बंधाऱ्याच्या कामाला दहा वर्षापूर्वी सुरूवात करून बंधाऱ्याचे काम माहे मे, २०१५ अखेरही अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर बंधाऱ्याचे काम तातडीने करण्याबाबत मा.जलसंपदा मंत्री यांना चंदगडचे लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बंधाऱ्यांचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) होय.

(४) सदर बंधारा हिरण्यकेशी नदीवर असून या योजनेच्या वरील बाजूस असलेला निधी मध्यम प्रकल्प पूर्ण झाल्यापासून नदीमधील को. प. बंधाऱ्याच्या साखळीमुळे सतत बारमाही प्रवाह असतो. योजनेच्या खालील बाजूस असलेल्या ऐनापूर को.प. बंधाऱ्यामध्ये लाभ धारकांच्या मागणीनुसार चित्री मध्यम प्रकल्पामधून वारंवार वियर्ग सोडण्यात येत असल्यामुळे प्रकल्पक्षेत्रावर नदीमध्ये सतत सुमारे १.५० ते २.०० ही स्थिर पाणी (Standing water) असते. त्यामुळे नदीपात्रामध्ये काम करण्यासाठी खुपच कमी कालावधी मिळतो. त्यामुळे नदीपात्रामध्ये काम करण्यासाठी खुपच कमी कालावधी मिळतो. त्यामुळे कामास विलंब होत आहे. तथापि, ठेकेदारांकडूनही कामाची उचित प्रगती व राखल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे ठेकेदारांस कळविले आहे. सद्य:स्थितीत नदीपात्रातील संपूर्ण लांबीतील अडचणीचे पायाचे (Foundation) काम पूर्ण झाले असून एकूण सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे उर्वरित काम मे-२०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंगरकिन्ही (ता. मालेगांव, जि. वाशिम) येथील लघु पाटबंधारे योजनेच्या घळभरणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(४६) २५७०९ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरकिन्ही (ता. मालेगांव, जि. वाशिम) येथील लघु पाटबंधारे योजनेच्या घळभरणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असुन त्यातील काळ्या मातीत कचरा दगड वापरण्यात आले असल्याचे दिनांक ८ जून, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या कामासंदर्भात चौकशी करण्यात येणेबाबत दिनांक २९ मे, २०१५ ला लेखी तक्रार देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) नाही.

तथापि, सद्यस्थितीत डोंगरकिन्ही साठवण तलावाचे गाळभरणीचे काम हाती घेण्यात आलेले नाही. सदर योजनेचे रोधीचराचे भरावयाचे काम सुरू असून नियमाप्रमाणे काळ्या माती मधील कचरा व दगड काढण्याचे काम चालू आहे. दरम्यान सदर कामाची तक्रार झाल्याने सदर कामाची पाहणी वेळेवरच उपविभागीय अधिकारी लघु सिंचन (जलसंधारण) उप विभाग, रिसोड तसेच कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, वाशिम यांनी केलेली आहे. व काम समाधान कारक असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, सदर कामाची लेखी तक्रार प्राप्त असून चौकशी दरम्यान सदर तक्रारीत तथ्य दिसून आले नाही व अनेक संबंधीत कास्तकारांनी सदर तक्रार चुकीची असल्याचे निवेदन दिनांक २४ जून, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, वाशिम व जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांना सादर केलेले आहे.
(३) संबंधित शाखा अभियंता/उपविभागीय अधिकारी सदर कामावर लक्ष ठेवून आहेत व सदर काम उत्कृष्ट दर्जाचे आढळलेले आहे.
(४) सदर कामाची चौकशी वेळेवरच झालेली असून तक्रारीत तथ्य नसल्यामुळे कोणावरही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच इतर कास्तकार व गावकरी यांनी सदर तक्रारीत तथ्य नसल्याबाबतचे निवेदन मा.जिल्हाधिकारी वाशिम यांना सादर केलेले आहे.

___

**वाशिम जिल्हयात ट्रामा सेंटर सुरु करणेबाबत**

**(४७) २६५४५ (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्याची निर्मिती होवून सुमारे १७ वर्षे झाले तरी अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून ट्रामा सेंटर सुरु करणेबाबत तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या दालनात लोकप्रतिनिधी व अधिका-यांची एक बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीच्या प्रारुपानुसार जिल्ह्यामध्ये ट्रामा सेंटर सुरु करणेबाबत जिल्हा प्रशासन व प्रशासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे काय,
(३) नसल्यास, अद्यापही कार्यवाही मध्ये दिरंगाई होत असल्याचे कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०२-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारीबाबत**

**(४८) २६५९० (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी शेख मोहम्मद शफी शेख अब्दुल रज्जाक यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याची निनावी तक्रार लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाल्यानुसार केलेल्या चौकशीत उघड झाल्यामुळे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१५)** :(१) श्री.शेख मोहम्मद शफी शेख अब्दुल रज्जाक हे नियम वयोमानानुसार वनक्षेत्रपाल, बीड या पदावरुन दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांची उघड चौकशी होऊन अपसंपदा असल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २१.१०.२०१४ रोजी त्यांच्यावर व त्यांच्या कुटूंबियांविरुध्द पोलीस स्टेशन जिन्सी, औरंगाबाद (शहर) येथे गु.र.नं. ३०४०/२०१४ कलम ३१(१)(ई) सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंध कायदा, १९८८ व भारतीय दंड विधान कलम १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर, श्री.शेख मोहम्मद शफी शेख अब्दुल रज्जाक, सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल तसेच त्यांचा मुलगा शेख मोहम्मद तौफीक शेख मोहम्मद शफी व शेख मोहम्मद साजेद शेख मोहम्मद श्फी यांना दिनांक २१.१०.२०१४ रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना दिनांक २२.१०.२०१४ रोजी जामीनीवर मुक्त केले आहे. तसेच आरोपी लोकसंवक यांची पत्नी श्रीमती रिहाना बेगम महंमद शफी यांना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने त्यांना सदर गुन्हयात दिनांक ०२.०२.२०१५ रोजी अटक करण्यत येऊन मा.न्यायालयाच्या आदेशानुसार अटकपूर्व जामीनावर सोडण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास अद्याप सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्ही (ता.जाफ्राबाद जि.जालना) येथील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४९) २७१९७ (१२-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्ही (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे सन २००६ मध्ये झालेल्या पाझर तलावामध्ये सन २००८ पासून पाणी साठत असून सदर तलावामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या असून अद्यापी भुसंपादनाचा मोबदला आजपर्यंत मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०९-२०१५) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर पाझर तलावाच्या कामासाठी संपादित होणाऱ्या जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, जालना यांनी दिनांक ७ जानेवारी २००६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी भुसंपादन समन्वय जालना यांना सादर केला होता. दिनांक २३ मार्च, २००७ रोजी या कामाची भुसंपादन बाबतची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली होती. परंतु शेतकऱ्यांच्या आक्षेपामुळे दिनांक १३ जून, २००९ व १४ जून, २००९ रोजी पुनश्च फेरमोजणी करण्यात आली होती.

संयुक्त मोजणी अहवालानुसार सुधारित भुसंपादन प्रस्ताव भुसंपादन कार्यवाही सहायक जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी प्रांत भोकरदन यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ तालुक्यातील शिंदी गावाजवळील खोरे तलावातील गाळ काढण्याबाबत

**(५०) २७४१४ (१७-०८-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील शिंदी गावाजवळील खोरे तलावातील गाळ काढण्यासाठी कृषी विभागाने महात्मा फुले जलसंधारण अभियानातंर्गत २ लाखांचा निधी जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाकडे वर्ग होवुनही अद्यापी कामास सुरुवात न झाल्याची बाब माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने काम सुरू न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने उक्तबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) खोरे तालुक्यातील गाळ काढण्याच्या कामास प्रत्यक्षात दिनांक २१/३/२०१५ रोजी सुरुवात करुन, दोन जे.सी.बी.यंत्र व १० डंपर गाळ वाहतुकीसाठी चालू करण्यात आले.

सदर काम ८ ते १० दिवस चालू होते. या खोरे तलावातून सुमारे ५००० घ.मी. गाळ काढण्यात येऊन, तो आजूबाजूच्या ३ ते ४ शेतात पसरविण्यात आला. तथापि अवकाळी पाऊस झाल्याने तलावात पाणी आल्यामुळे सदर काम बंद पडले. त्यानंतर तलावातील आजूबाजूच्या शेतांमध्ये पिक उभी असल्यामुळे गाळ काढता आली नाही. पिक कापणीनंतर तलावातील गाळ काढण्याचे प्रयोजन आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.